457
451
463

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-२/झोपुआ/६२९ /२०२२
दिनांक : २२/०६/२०२२

झोपडपट्टी निर्मुलन आदेश
(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ड अन्वये अंतिम अधिसूचना)

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **उक्त अधिनियम** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र.झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि.३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि. ११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये मौजे कोथरुड स.नं.२५/१, सि.स.नं.६६० पैकी, गोसावी वस्ती, हॅप्पी कॉलनी या झोपडपट्टीचे एकूण क्षेत्र ३०६१.०७ चौ.मी (यापुढे ज्याचा उल्लेख "सदर क्षेत्र" असा करण्यात आला आहे.) या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.ग्रेस डेव्हलपर्स यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.०९/१०/२०१९ रोजी प्रस्ताव दाखल केलेला असून सदरच्या प्रस्तावास झो.पु.प्रा., पुणे कडील नियमावली, २०१४ यातील नियम क्र. ४ (५) च्या तरतूदीनुसार दि.३१/०३/२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे ; आणि

ज्याअर्थी, सदर मिळकतीवरील झोपडपट्टीचे सर्वेक्षण करण्यात येऊन झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट २) तयार करण्यात आली असून उक्त परिशिष्ट २ नुसार सदर क्षेत्रावर एकूण १३० झोपडया असून त्यापैकी पात्र निवासी ९८ आणि पात्र बिगर निवासी ०३ या प्रमाणे एकूण १०१ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत; तसेच प्रत्यक्ष जागेवर सार्वजनिक बांधकामे एकूण ०३ आहेत; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्र दि.२३/०३/२०२२ रोजीच्या आदेशाद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ३क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असून सदरचा आदेश महाराष्ट्र शासन राजपत्र दि.३१ मार्च २०२२ ते दि.०६ एप्रिल २०२२ पृष्ठ क्र.७ व ८ वर आणि दै.सांज़महानगरी व दै.विश्वेश्वर वृत्तपत्रात दि.०६/०४/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आलेला आहे तसेच सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रकारे योजनाक्षेत्रात दि.०७/०४/२०२२ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आलेला आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत शिखर तक्रार निवारण समिती अथवा कोणत्याही न्यायालयाचा स्थगिती आदेश नाही आणि म्हणून, झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी

झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / झोपड्या पाडून सदरचे क्षेत्र रिकामे करणे व उक्त अधिनियमाच्या कलम ३ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे; आणि

ज्याअर्थी, विकसक मे.ग्रेस डेव्हलपर्स यांचेमार्फत पात्र झोपडीधारकांचे तात्पुरते स्थलांतरण करणेसाठी उक्त क्षेत्रावरील पात्र झोपडीधारकांना कायमस्वरूपी पुनर्वसन सदनिका देण्यात येईपर्यंतच्या कालवधीकरीता भाड्याची रक्कम देण्याचे मान्य केले आहे; आणि

ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची पुर्वसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१९ मे २०२२ दि.२५ मे २०२२ पृष्ठ क्र.८ व ९ वर आणि महाराष्ट्र निरोप्या व दिवस रात्रि वृत्तपत्रात दि.१८/०५/२०२२ रोजी प्रसिध्द करणेत आली असून सदरची पुर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसुन येईल अशा प्रकारे योजनाक्षेत्रात दि.१३/०५/२०२२ रोजी डकवून प्रसिद्ध करण्यात आली आहे; आणि

ज्याअर्थी, उपरोक्त पूर्वसूचनेतील नमूद ३० दिवसांच्या कालावधीत सदर क्षेत्रातील प्रत्येक झोपडी पाडून त्याखालील क्षेत्र मोकळे करून ती जागा विकसक यांच्या ताब्यात देण्यास फर्मावण्यात आले होते त्यानुसार, सदर क्षेत्रावरील एकूण १३० झोपड्यांपैकी ०३ सार्वजनिक वगळता उर्वरित १२७ झोपडीधारकांपैकी केवळ २ झोपडीधारक यांनी त्यांच्या झोपडया रिकामी करुन सदरची जागा विकसक यांच्या ताब्यात दिलेली नसल्याबाबत विकसक यांनी या कार्यालयास कळविले आहे.

आणि सदर क्षेत्रातील झोपडीधारकांना प्रस्तुत आदेशाद्वारे कळवित आहे की,-

१) उक्त अधिनियमाच्या कलम १२(८) अन्वये उपरोक्त नमूद मुदत संपुष्टात आलेनंतर देखील इमारत/झोपडी पाडून टाकण्यात आली नसल्यासचे निदर्शनास आले, त्यामुळे इमारतीत/झोपडीमध्ये प्रवेश करण्याचे व इमारत पाडून टाकण्याचे तसेच इमारतीतील सामानाची विक्री करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अथवा त्यांनी प्राधिकृत करतील अशा अधिका-यास राहतील.

२) कोणत्याही झोपडीधारकाने विहीत मुदतीत त्याची झोपडी रिकामी न केल्यास / झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा झोपडीधारक, मग तो पात्र असो अथवा अपात्र, उक्त अधिनियमाच्या कलम ३झ अन्वये त्याचा पुनर्वसनाचा अधिकार गमावून कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

३) सदरच्या आदेशाचे पालन करण्यास कसूर करणारी कोणतीही व्यक्ती उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये, ३ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा १००० रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा दोन्हीस पात्र राहील.

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३ड मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी निर्मुलन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करीत आहे.

465

सदरच्या आदेशामुळे व्यथित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास उक्त अधिनियमाच्या कलम ३-ड सह कलम १२ (४) अन्वये ३० दिवसांचे आत शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

झोपडपट्टीचे नाव : स.नं.२५/१, सि.स.नं.६६० पैकी, गोसावी वस्ती, हॅप्पी कॉलनी, कोथरुड, पुणे.
महानगरपालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका

अनुसूची

| गाव | स.नं./ सि.स.नं. /फा.प्लॉ.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (मोजणी नकाशा नुसार रस्त्या अंतर्गत क्षेत्र सोडून उर्वरित क्षेत्र) | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| मौजे कोथरुड | स.नं.२५/१, सि.स.नं.६६० पै.. गोसावी वस्ती. हॅप्पी कॉलनी. कोथरुड | पुणे महानगरपालिका | ३०६१.०७ चौ.मी. | पुर्वेस - लागू कॅनॉल<br>पश्चिमेस - लागू स.नं.१६८<br>दक्षिणेस - लागू प्लॉ.नं.२६ व स.नं.२५ पैकी<br>उत्तरेस - लागू स.नं.१६६ | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- 22/०६/२०२२

22-6-2022
(राजेंद्र निंबाळकर) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
o/c झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

कार्यवाहीस्तव प्रत -
१) मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका - यांना माहितीसाठी सादर.